आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

४ जुलै २०२४ - गुरुवार

राज्यात वाचन चळवळीला चालना देण्यासाठी शासन अनुदानित सुमारे साडे अकरा हजार ग्रंथालयं असून नव्यानं सहा ते सात हजार ग्रंथालयं सुरु करण्यात येतील, अशी माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानपरिषदेत दिली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अरुण लाड यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तासाच्या चर्चेला ते उत्तर देत होते.

राज्य पोलीस दलात कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली पदं ही तांत्रिक आहेत. एकीकडे ही तात्पुरती भरती ११ महिन्यांसाठी करत असतानाच दुसरीकडे ८१ पदांच्या नियमित भरतीच्या प्रक्रियेला मान्यता देण्यात आली आहे, उर्वरित पदांच्या भरतीची प्रक्रियाही सुरू आहे, असं स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत दिलं. आमदार रमेश पाटील यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला ते उत्तर देत होते. भारतीय तटरक्षक दल, नौदल अशा यंत्रणांमधून सेवानिवृत्त झालेल्यांची भरती कंत्राटी तत्त्वावर करण्यात आली आहे, असंही त्यांनी सांगितलं. स्थानिक कोळी समाजातल्या पात्र उमेदवारांना प्राधान्य दिलं जाईल, असंही फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

आक्षेपार्ह शब्द वापरल्याप्रकरणी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचं पाच दिवसांसाठी केलेलं निलंबन तीन दिवसांवर आणण्याचा प्रस्ताव विधानपरिषदेने आज एकमताने मंजूर केला. संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी हा प्रस्ताव मांडल्यावर आवाजी मतदानाने तो मंजूर करण्यात आला.

<><><><><>

खटल्यांचा जलद निपटारा करण्यासाठी देशभरातल्या सर्व न्यायालयं आणि न्यायाधिकरणांमधे उत्तम पायभूत सुविधांची गरज सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी व्यक्त केली आहे. ते आज मुंबईत रोखे अपीलीय न्यायाधिकरणाच्या नव्या कार्यालयाचं उद्घाटन केल्यानंतर दूरदर्शनशी बोलत होते. प्रत्यक्षातल्या तसंच

आभासी माध्यमातून होणाऱ्या कामकाजासाठीही या सुविधांची गरज आहे, असं त्यांनी सांगितलं. गेल्या काही वर्षात भांडवली बाजाराचा बहुस्तरीय विस्तार झाला आहे. हे लक्षात घेता गुंतवणूकदारांचं हितरक्षण करण्यासाठी न्यायाधिकरणाच्या अतिरिक्त शाखा असणं आवश्यक आहे, असंही ते म्हणाले.

<><><><>

संसद अधिवेशनादरम्यान लोकसभेत खासदारांच्या शपथविधीच्या वेळी घोषणाबाजी झाल्यानंतर सभापती ओम बिरला यांनी त्यासंबंधीच्या नियमात बदल केला आहे. सुधारित नियमानुसार कोणत्याही सदस्याला शपथ घेतेवेळी शपथेच्या मजकुराव्यतिरिक्त इतर काहीही घोषणा किंवा शेरा देता येणार नाही.

<><><><>

नीती आयोगाचं संपूर्णता अभियान ४ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान राबवण्यात येणार आहे. या अभियानात देशातल्या ५०० तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. या अभियानामार्फत गरोदर मातांची तपासणी, उच्च रक्तदाब आणि मधुमेह तपासणी, गरोदर मातांना पोषण आहार, मृदा आरोग्य पत्रिका आणि स्वयंसहाय्यता गटांना खेळतं भांडवल देण्यात येणार आहे.

यवतमाळ जिल्ह्यात झरी-जामणी या आकांक्षित तालुक्यात आज नीती आयोगाच्या संपूर्णता अभियानाचं उद्घाटन करण्यात आलं. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांसह उपस्थितांनी आकांक्षित तालुक्याला सक्षम आणि समृद्ध करण्याची प्रतिज्ञा केली.

<><><><>

नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक घोटाळा प्रकरणी माजी मंत्री सुनील केदार यांना दोषी ठरवणाऱ्या अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती द्यावी अशी मागणी करणारा केदार यांचा अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठानं आज फेटाळून लावला. जिल्हा मध्यवर्ती सहकारी

बँकेमध्ये १५० कोटींपेक्षा जास्त रकमेच्या  सरकारी रोखे खरेदी घोटाळा प्रकरणी सुनील केदार यांना २२ डिसेंबर २०२३ रोजी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी ५ वर्षे सक्तमजुरी  आणि साडे बारा लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती. उच्च न्यायालयानं  गेल्या जानेवारीमध्ये केदार यांची शिक्षा निलंबित करून त्यांना जामीन दिला आहे.

<><><><><>

टी - ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकून आज बार्बाडोसहून मायदेशी परतलेल्या भारतीय संघानं दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.  प्रधानमंत्र्यांनी क्रिकेट संघाला शाबासकी दिली आणि संपूर्ण देशाला त्यांचा अभिमान वाटत असल्याचं सांगितलं.  केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी नवी दिल्ली विमानतळावर विश्वविजेत्या संघाचं स्वागत केलं. मोठा जनसमुदाय विमानतळाबाहेर उपस्थित होता.

भारतीय क्रिकेट संघाचा गौरवसोहळा आज  मुंबईत वानखेडे स्टोडियमवर होणार असून त्यापूर्वी हा संघ मिरवणुकीने समारंभाच्या स्थळी पोहोचेल.

या सर्व कार्यक्रमाला होणारी गर्दी लक्षात घेऊन सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. एन सी पी ए ते मेघदूत पुलापर्यंतचा मार्ग वाहनांना फिरण्यास तसंच पार्किंग करण्यास बंद राहील. वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा, असं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

//<><><><><>//